# देशभरात धावत्या रेल्वेत सात लाख गुन्हे

## गुन्हेगारी घटनांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी

**आनंद कस्तुरे, लोकसत्ता**

**नागपूर :** गेल्या वर्षभरात धावत्या रेल्वेत देशभर ७ लाख १७ हजार ३२८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. यात ६ लाख ८२ हजार १०४ जणांचा दोष सिद्ध झाला. दोषसिद्धीचे सरासरी प्रमाण ९५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या क्रमात महाराष्ट्रात १ लाख ४६ हजार ६२६ घटनांची नोंद झाली.

तीन वर्षांची सरासरी काढली तर झारखंड गुन्हे दाखल होण्याच्या प्रमाणात पहिले ठरले आहे. येथे ११८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात रेल्वे प्रवासात दाखल एकूण गन्ह्यांपैकी १ लाख ४६ हजार ८१४ जणांना अटक झाली. हे गुन्हे करणाऱ्या १ लाख ४४ हजार ९२७ जणांवर आरोपपत्र दाखल झाले. यातून सर्वाधिक १ लाख ४५ हजार जण दोषी आढळले. रेल्वे गुन्ह्यांत महाराष्ट्रातला दोषसिद्धीचा दर अन्य राज्यांच्या तुलनेत अधिक आहे.

महाराष्ट्राखालोखाल ९९ टक्के यशस्वी दर गुजरातचा आहे. गुजरातमध्ये दाखल ८० हजार ३०४ गुन्ह्यांपैकी ७४ हजार ४२७ जण दोषी आढळले. झारखंडमध्ये ४६ हजार ४०२ गुन्हे नोंदवले गेले. यातून ४६ हजार ७ जणांना दोषी ठरवण्यात आले. पश्चिम बंगालमध्ये रेल्वे गुन्हे कायद्याखाली ६६ हजार ७४३ जणांना अटक झाली. त्यात ६२ हजार २२६ जण दोषी ठरले.

### हिमाचल प्रदेशमध्ये फक्त ५० गुन्ह्यांची नोंद

हिमाचल प्रदेशमध्ये रेल्वे गुन्ह्यांचे प्रमाण कमी असूनही दोषी ठरण्याचे प्रमाण मात्र सर्वाधिक आहे. हिमाचल प्रदेशमध्ये फक्त ५० गुन्ह्यांची नोंद झाली. यातील ९९ टक्के गुन्हेगार दोषी आढळले. रेल्वे जाळे विस्तारिकरणात कमी सक्रिय इशान्येकडील राज्यांमध्ये अरुणाचल, मणिपूर, मेघालय, मिझोराम, सिक्कीम सारखी राज्ये तर केंद्र शासित प्रदेश असलेल्या लक्षद्वीप, दिव दमण क्षेत्रांमध्ये गुन्हे नोंदवलेच गेलेले नाहीत. त्यामुळे आरपीएफची उपस्थिती, संसाधनांची उपलब्धता आणि जागरूकता याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

लांब पल्ल्यांच्या रेल्वेत सातत्याने गस्त वाढवली जात आहे. प्लॅटफॉर्म सुरक्षेवर भर देऊन कुली, व्हेंडर्सना ताकिद दिली गेली आहे. सीसीटीव्ही वाढविण्यात आले आहेत. समूह पोलिसिंगचे प्रशिक्षण दिले जात आहे.
**– मनोज कुमार,** वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त, रेल्वे संरक्षण दल.

### देशातील एकूण गुन्ह्यांची स्थिती

| वर्ष | गुन्हे |
|---|---|
| २०२० | २,५४,६३६ |
| २०२१ | ४,२४,०२७ |
| २०२२ | ७,१७,३२८ |



| राज्य | २०२० | २०२१ | २०२२ | सरासरी |
|---|---|---|---|---|
| झारखंड | ५,०९४ | १३,२२३ | ४६,४०२ | ११८.०६ |
| महाराष्ट्र | ६८,२१५ | ९६,६४८ | १,४६,६१२ | ११६.०६ |
| गुजरात | १९,६१५ | ४९,५८७ | ८०.३४६ | १११.३ |
| छत्तीसगड | ४,८९७ | १४,१५६ | | ९८.०१ |
| मध्य प्रदेश | १९,०९९ | ३३,९८२ | ५९,९८६ | ६९.०८ |
| केरळ | ७,९९७ | १५,१३७ | २२,६८८ | ६३.०६ |
| दिल्ली | ४,७५८ | ८,६९२ | १३,४२५ | ६३.०६ |
| पश्चिम बंगाल | १३,९३२ | ३०,१४९ | ५६,७७५ | ५७.०५ |
| ओडिशा | ६,४१४ | ८,९९२ | २२,२९० | ४८.०४ |
| तामिळनाडू | १२,०३६ | १८,६४७ | ३१,७०१ | ४१.०३ |

# सामूहिक प्रयत्नातून समृद्ध, सुरक्षित नागपूर घडवूया

- मुख्य शासकीय कार्यक्रमात पालकमंत्र्यांचे आवाहन
- स्वातंत्र्यदिनी शहरात विविध ठिकाणी ध्वजारोहण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आरोग्य, शिक्षण, रोजगारासह सर्वच क्षेत्रात वेगाने विकासकामे सुरू आहेत. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या सामूहिक प्रयत्नातून अधिक समृद्ध, सुरक्षित आणि विकसित नागपूर घडवण्यासाठी नागरिकांनीही योगदान द्यावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

स्वातंत्र दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहणानंतर आयोजित कार्यक्रमात बावनकुळे बोलत होते. ते पुढे म्हणाले, प्रत्येक घटकातील व्यक्तीला विविध विकास योजनांच्या माध्यमातून प्रगती पथावर आणण्याचे ध्येय शासनाने निश्चित केले आहे. शहर पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांच्या नेतृत्वात गरुडदृष्टी या उपक्रमाच्या माध्यमातून लक्षणीय काम झाले आहे. समाज विघातक, द्वेष निर्माण करणाऱ्या पोस्ट विविध माध्यमांवर आल्यास त्यांना तत्काळ शोधून कारवाई करणे आता शक्य झाले आहे. ग्रामीण पोलीस विभागाने सावनेर शहरात पहिली एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा सुरू केली. याच आधारावर नागपूर शहरातही सीसीटीव्हीचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. याप्रसंगी खा. श्यामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, अतिरिक्त आयुक्त माधवी चवरे- खोडे, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, महानगरपालिका आयुक्त अभिजीत चौधरी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीना, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डिकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा व अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला.



### उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलिसांचा गौरव

पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांच्या हस्ते पोलीस भवन, सिव्हील लाईन येथे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आलेले सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, सहा. पोलीस आयुक्त नरेंद्र हिवरे, अनिल ब्राम्हणकर यांना गौरवण्यात आले. नागपूर ग्रामीण येथील राष्ट्रपती पदक प्राप्त रमेश ताजने यांच्यासह इतरही अधिकारी-कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले.

### शहराला देशाचे 'ग्रोथ इंजिन' करणार- डॉ. चौधरी




नागपूर शहराला देशाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून ओळख मिळवून देण्याकरिता सक्षम, लोकाभिमुख व कार्यक्षम धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. चौधरी यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, विजया बनकर, मिलिंद मेश्राम, गणेश राठोड, राजेश भगत, डॉ. रंजना लाडे, अशोक गराटे, डॉ. दीपक सेलोकर उपस्थित होते.

### सौर ग्राम दिनाचा शुभारंभ



महावितरणतर्फे विद्युत भवन कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण केले गेले. यावेळी 'सौर ग्राम दिन' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. दोडके यांनी हिरवा झेंडा दाखवून ह्यासौर चित्ररथाह्मला रवाना केले. हा चित्ररथ नागरिकांना प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची माहिती देणार आहे.

### 'प्रायोरिटी सेक्शन'मध्ये दीड वर्षांत मेट्रो सेवा



महामेट्रोचा दुसरा टप्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. 'प्रायोरिटी सेक्शन'मध्ये प्रवासी सेवा दीड वर्षांत सुरू करण्याचे लक्ष्य आहे, अशी माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी दिली. मेट्रो भवन येथे ध्वजारोहणानंतर ते संबोधित करत होते. हर्डीकर पुढे म्हणाले, ऑटोमोटिव्ह चौक ते लेखा नगर मेट्रो स्थानकांदरम्यानचा विभाग हा महामेट्रो नागपूरचा प्रायोरिटी सेक्शन असून तो ६.९२ किलोमीटरचा आहे. महामेट्रोने नागरिकांना सुरक्षित आणि वेळेत सेवा देण्यात उच्च मानांकन गाठले आहे. मेट्रोने दररोज सरासरी एक लाख प्रवासी प्रवास करतात.

### श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त आज मिरवणूक

**विश्व हिंदू परिषदेचे आयोजन**

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर:** विश्व हिंदू परिषदेचा स्थापना दिन आणि श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त उद्या रविवारी 'विहिंप'तर्फे मिरवणूक काढली जाणार आहे. त्यात ५० हून अधिक देखावे असतील, अशी माहिती शनिवारी विश्व हिंदू परिषदेततर्फे देण्यात आली.

धंतोलीतील गोपाळकृष्ण मंदिर गौरक्षण सभा येथून दुपारी ४.०० वाजता मुख्य रथ पूजेसह मिरवणुकीचा शुभारंभ होईल. मिरवणुकीत विविध व्यावसायिक संघटना, सामाजिक संघटनांसह ४० हजारांहून अधिक भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे.

मिरवणुकीत श्रीकृष्ण, गोंडी नृत्य, महिला शक्तीचा जागर या सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर आधारित देखावे असतील. यंदा संत ज्ञानेश्वर महाराजांवर आधारित दृश्य, महाकालीचे दृश्य, हनुमानजींचे दृश्य विशेष आकर्षणाचे केंद्र आहे.

# जोगेंद्र कवाडेंच्या भाषणाला सामूहिक विरोध

## भाजपशी युती केल्याचा संताप, अखेर मंच सोडून परतावे लागले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** माजी आमदार तसेच पीपल्स रिपबल्किन पार्टीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांना शनिवारी आंबेडकरी नागरिकांच्या संतापाला सामोरे जावे लागले. कवी सुरेश भट सभागृहातील एका कार्यक्रमात भाषणाला उभे होताच भाजपशी युती केल्याचा संतापातून त्यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्याचे कळते. त्यामुळे त्यांना भाषण न करताच मंच सोडावा लागला.

देशभरातील बौद्ध समाजापर्यंत महाबोधी विहार मुक्ती आंदोलनासंदर्भातील माहिती पोचवण्यासाठी शनिवारी रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात कवाडे यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाबोधी विहार आंदोलनाचे अग्रणी भंते विनयाचार्य तसेच भगवान बुद्ध यांची भूमिका साकारणारे अभिनेते हिमांशू सोनी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. यावेळी भंते रेवत संघनायक, भंते उपगुप्त, भीमराव आंबेडकर, भदंत ज्ञानज्योती, भंते हर्षबोधी उपस्थित होते.

बुद्धिस्ट समन्वय संघ, महाराष्ट्र आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रा. कवाडे यांना मत मांडण्यासाठी आयोजकांनी मंचावर आमंत्रित केले. परंतु, माईक हाती धरताच प्रेक्षकांनी कवाडे यांच्या विरोधात मुर्दाबादच्या घोषणा दिल्या. गोंधळाकडे दुर्लक्ष करून कवाडे यांनी बोलण्याचा प्रयत्न केला. मी भाषणासाठी येथे आलो नाही असेही त्यांनी सांगितले. मात्र गोंधळ आणखी वाढला. लोकांचा विरोध बघून अखेर त्यांनी सभागृह सोडले. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर पीरिपाने शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. पक्षाचे कार्याध्यक्ष जयदीप कवाडे हे महायुती सरकारमध्ये औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आहेत.

### आंदोलन पुढे नेण्याचा संकल्प

यावेळी भंते विनाचार्यांनी समाजाला सोबत घेऊन आंदोलन पुढे नेणार असल्याचे सांगितले. यासाठी या लढयात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विचारपीठावर भंते रेवत संघनायक भारत, भदंत ज्ञानज्योती, भदंत हर्षबोधी यांच्यासह दिल्लीचे माजी मंत्री राजेंद्रपाल गौतम, बसपाचे राष्ट्रीय समन्वयक जयप्रकाश उपस्थित होते. संचालन मुकेश बागडे व स्मिता वाकडे यांनी केले. प्रास्ताविक राकेश धारगावे तर निमंत्रक म्हणून नितीन गजभिये यांनी विचार व्यक्त केले. आभार योगेश राऊत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश गजभिये, मुकेश मेश्राम, विलास मेश्राम, दिनेश शेंडे, सतीश गजभिये, कुणाल गजभिये, दिलीप बागडे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अतुल लोंढे यांना ठार मारण्याची धमकी

## ५० लाखांची खंडणीही मागितली

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

नागपूर : ''तू टीव्हीवर जास्त बोलत जाऊ नकोस, नाही तर तुझा खून करायला मला वेळ लागणार नाही. माझा फोन एका रिंगमध्ये उचलला नाहीस तर जिवंत ठेवणार नाही. जिवंत रहायचे तर ५० लाख रुपये तयार ठेव'' अशा शब्दात काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांना धमकी देण्यात आली.

लोंढे यांनी याबाबत शुक्रवारी नंदनवन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे. पोलिसात दाखल तक्रारीनुसार, माध्यमावरील चर्चेत भाग घेताना लोंढे यांनी काँग्रेसची भूमिका मांडली. तेव्हापासून त्यांना एकाच मोबाईल क्रमांकावरून सातत्याने धमकी दिली जात आहे. धमकी मिळाल्यानंतर लोंढे यांनी तो क्रमांक ब्लॉक केला तर धमकावणाऱ्याने व्हॉट्सअॅप कॉल केला व ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचे लोंढे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.



विचार सहन होत नसतील तर ते सर्वच बंद करून टाका. लोकशाही तशीही संपलेलीच आहे. भाजपजवळ जेव्हा तर्कशुद्ध उत्तर नसते, त्यावेळी ते या पातळीवर उतरतात. काँग्रेस नेत्यांसोबत असे प्रकार सातत्याने घडत आहेत. गुंड प्रवृत्तीची माणसे जीवावर उठत असताना सरकार शांत बसत असेल तर यात सरकार सुद्धा सहभागी असल्याची शंका येते.
**– अतुल लोंढे,** मुख्य प्रवक्ते, काँग्रेस.

# संविधान प्रास्ताविका उद्यान म्हणजे ऐतिहासिक पाऊल

## गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ परिसरात उभारण्यात आलेल्या संविधान प्रास्ताविका उद्यानाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटन झाले. ज्यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने संविधान प्रास्ताविक पार्कच्या प्रकल्पासाठी निधी मंजूर केला, त्यावेळी मी या विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू व व्यवस्थापन परिषदेचा अध्यक्ष होतो. त्यामुळे या प्रकल्पाला माझा हातभार लागला. संविधान प्रास्ताविका उद्यान हे विद्यापीठ व समाजाचे एक ऐतिहासिक पाऊल आहे, असे मत गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले.

भव्य प्रवेशद्वार आणि लोकशाहीच्या स्तंभांच्या प्रतिकृती (राष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालय, अशोक स्तंभ) असलेले दोन एकर क्षेत्रफळाचे हे उद्यान भारतीय संविधानात समाविष्ट असलेल्या मूल्यांचे आणि आदर्शांचे जिवंत स्मारक आहे. उद्यानासाठी जी समिती तयार झाली होती, त्या समितीतील सर्वांचे योगदान वर्णनातीत आहे. विद्यापीठाचे तत्कालीन कुलुगुरु डॉ. सिद्धार्थ काणे यांच्या कल्पनेतून साकार झालेले हे उद्यान नागपूर शहराचे भूषण आहे.

शैक्षणिक आणि अनुभवात्मक शिक्षण देणाऱ्या या उद्यानात विद्यार्थी संविधानाच्या तत्त्वांशी मूर्त मार्गाने संवाद साधू शकतात. भित्तीचित्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्धरण आणि इतर दृश्य घटक नागरिकांना या आदर्शांना आत्मसात करण्याची प्रेरणा देतात. प्रस्तावनेतील तत्त्वांचे प्रदर्शन, कायद्याचे राज्य, लोकशाही संस्था आणि मूलभूत अधिकारांबद्दल आदर निर्माण करतात, म्हणून, संविधान प्रस्तावना उद्यान महत्वाचे ठरते, अशी भूमिका डॉ. बोकारे यांनी मांडली.

### उद्यानाच्या निर्मितीत योगदान दिलेल्यांचा गौरव



संविधान प्रास्ताविका उद्यानाच्या निर्मितीत योगदान दिलेल्या शिल्पकारांचा कार्यगौरव सोहळा धनवटे महाविद्यालयातील मातोश्री विमलाताई देशमुख सभागृहात पार पडला. या उद्यानासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. त्यामुळे या कार्यक्रमात या समितीतील सदस्य सेवानिवृत्त न्यायमूर्ती किशोर रोही, माजी आमदार प्रा. जोगेंद्र कवाडे, विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम, माजी आमदार प्रकाश गजभिये, माजी आमदार प्रा. अनिल सोले, गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांचा यावेळी कृष्णा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस कराडचे प्रमुख सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


**OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd. — ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**

कॉर्पोरेट कार्यालयः कोहिनूर स्क्वेअर, सत्तेचाळीसावा मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी.गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई- 40028. संपर्क क्र. - 9773406175.

**[परिशिष्ट-IV- ए] [नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) ची तरतूद पाहावी]**
**अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9(1) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सर्व लोकांना आणि खासकरून कर्जदार मे. अफझल ट्रेडिंग आणि मे. हारिस ट्रेडिंग कंपनी आणि मे. किसान आलू कंपनी आणि सह-कर्जदार श्रीमती निगार सुलताना खालिद नदीम रईन (प्रोपा. मे. हारिस ट्रेडिंग कंपनी) मो. अफझल हझीफअझरूलरहीम रईन, मे. अफझल ट्रेडिंग कंपनी प्रा.लि., श्री खालिद रहीम अल्लारखा, मे. एम.डी. बिल्डर्स अँड लँड डेव्हलपर्स, श्री खादीम नदीम अल्लारखा (प्रोप्रा. मे. किसान आलू कंपनी), मो. अफझल हझीफ अझरूल रहीम रईन (प्रोप्रा. मे. अफझल ट्रेडिंग कंपनी), फरहाना शबनम, पतीचे नाव मो. अफझल रईन, यांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा नागपूर नागरिक सहकारी बँक (NNSB) च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून तिची दि. 13.06.2018 रोजीनुसार सुरक्षित धनको मे. ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना वर नमूद कर्जदार व सह-कर्जदार यांचेकडून घेणे असलेल्या **रु. 4,58,76,974/- (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लक्ष शहात्तर हजार नऊशे चौरयाहत्तर फक्त) अधिक व्याज व इतर खर्च एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी दि. 04.09.2025 रोजी स. 11.00 वाजता (बोली सादरीकरणाचा शेवटचा दिनांक व वेळ आहे 03.09.2025 रोजी सायं. 6.00 वाजेपर्यंत) ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आणि ''इतर कोणताही उपाय नाही''** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

(ओमकारा पीएस 47/2021-22 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी दि. 21.03.2022 रोजीच्या अभिहस्तांकन करारान्वये वर नमूद कर्जदार / जामीनदार यांचे संपूर्ण थकबाकी कर्ज नागपूर नागरिक सहकारी बँक (NNSB) यांचेकडून अंतर्निहित अनामतीसह अधिग्रहित केले आहे.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत व बयाणा रक्कम तसेच ज्ञात बोजे इ. चा तपशील खालीलप्रमाणे आहेः

| मालमत्तेचे वर्णन | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| 1. खसरा क्र. 183 मधील सुमारे 65162 चौ.फू. (6053.747 चौ.मी.) क्षेत्रफळ जमिनीमधील 0.71% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, मौजा नागपूर, महापालिका घर क्र. 644, 644-ए, 644-बी, व 644-सी, सिटी सर्वे क्र. 204 आणि शीट क्र. 152 व 153, स्मॉल फॅक्टरी परिसर, बगडगज लेआउट, भंडारा रोड, नागपूर, नागपूर महानगर पालिका वॉर्ड क्र. 23 च्या हद्दीत, तहसील व जिल्हा नागपूर, सोबत तेथील आरसीसी बांधकाम असलेली सदनिका क्र. सी- 103, एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 79.347 चौरस मीटर किंवा 854.09 चौरस फूट, पहिला मजला, प्रीतम कॉम्प्लेक्स, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23 आणि **चतुःसीमाः** उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस - पॅसेज आणि सदनिका धारकांसाठी पार्किंग, पूर्वेस- सदनिका क्र. सी-104, पश्चिमेस -सदनिका क्र. सी-102 आणि खसरा क्र. 183 मधील सुमारे 65162 चौ.फू. (6053.747 चौ.मी.) क्षेत्रफळ जमिनीमधील 0.71% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, मौजा नागपूर, महापालिका घर क्र. 644, 644-ए, 644-बी, व 644-सी, सिटी सर्वे क्र. 204 आणि शीट क्र. 152 व 153, स्मॉल फॅक्टरी परिसर, बगडगज लेआउट, भंडारा रोड, नागपूर, नागपूर महानगर पालिका वॉर्ड क्र. 23 च्या हद्दीत, तहसील व जिल्हा नागपूर, सोबत तेथील आरसीसी बांधकाम असलेली सदनिका क्र. सी इ 102, एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 79.347 चौरस मीटर किंवा 854.09 चौरस फूट, पहिला मजला, प्रीतम कॉम्प्लेक्स, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23 आणि **चतुःसीमाः** उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - पॅसेज आणि सदनिका धारकांसाठी पार्किंग, पूर्वेस - सदनिका क्र. सी-103, पश्चिमेस - सदनिका क्र. सी-101. (एकत्रित केलेली सदनिका) | रु. 72,90,000/- | रु. 7,29,000/- |
| 2. मौजा म्हसाळा प.ह.न. 15, आर.न.म. कामठी, ता. कामठी, जिल्हा नागपूर, हद्दी खसरा क्र. 112, 113, ग्राम पंचायत कवठा, प्लॉट क्र. 105, 106, 107, 108, कंपनीद्वारे पाडण्यात आलेल्या प्लॉटमधील- हिस्सा 3 (आर 5,6,7,8) (अक्षरी एकशे पाच, एकशे सहा, एकशे सात, एकशे आठ हिस्सा तीन आर सहा, सात, आठ) 1) प्लॉट क्र. 105 ची लांबी व रुंदी (हिस्सा 3 आर5): 10.00 x 14.25 = 142.50 चौ.मी. (1533.87 चौ.फू.) 2) प्लॉट क्र. 106 ची लांबी x रुंदी (हिस्सा 3 आर6): 1/2 (11.25+11.50) x 14.25 = 162.09 चौ.मी. (1744.73 चौ.फू.) 3) प्लॉट क्र. 107 ची लांबी व रुंदी (हिस्सा 3 आर7): 1/2 (11.00+11.25) x 14.25 = 158.53 चौ.मी. (1706.41 चौ.फू.) 4) प्लॉट क्र. 108 ची लांबी व रुंदी (हिस्सा 3 आर8): 10.00 x 14.25=142.50 चौ.मी. (1533.87 चौ.फू.), एकूण क्षेत्रफळ सुमारे 605.84 चौ.मी. (6518.88 चौ.फू.). **चतुःसीमाः** पूर्वेस- लेआउट रस्ता, पश्चिमेस- लेआउट रस्ता, उत्तरेस - लेआउट रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. 104, 109 (हिस्सा 3 (आर4,9) | रु. 47,52,000/- | रु. 4,75,200/- |

| | |
|---|---|
| ई-लिलावाचा दिनांक | 04/09/2025 रोजी दु. 1.00 ते दु. 2.00 वा. |
| किमान बोली वृद्धी रक्कम | रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार फक्त)<br>रु. 20,000/- (रुपये वीस हजार फक्त) |
| सहभागाचे बोलीपत्र/ केवायसी कागदपत्रे / बयाणा रकमेच्या भरण्याचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ | 03.09.2025 रोजी सायं. 6.00 वा. |
| पाहणीचा दिनांक | 30.08.2025 रोजी दु. 1.00 ते 4.00 वाजेपर्यंत |

**ज्ञात दायीत्व-** आमच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर ज्ञात बोजे नाहीत, परंतु, इच्छुक बोलीदारांनी लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालमत्तांचा मालकी हक्क इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी.

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदारांसाठी असलेली पंधरा दिवसांची सूचनादेखील आहे.

**विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे http://omkaraarc.com/auction.php येथे दिलेली लिंक पाहावी आणि प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175 ईमेलः Pratiksha.patel@omkaraarc.com) यांचेशी संपर्क साधावा. बोलीदार वेबसाईटला http://www.bankeauction.com येथे भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार मे. सी1 इंडिया प्रा.लि., टेली. हेल्पलाईनः +91-7291981124 / 25/ 26, हेल्पलाईन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, श्री श्री भाविक पंड्या, मोबाईल- 88666 82937 ई-मेल- Maharashtra@c1india.com येथे भेट द्यावी. इच्छुक बोलीदारांनी नादारी व दिवाळखोरी संहिता, 2016 च्या अनुच्छेद 29ए चे पालन करावे आणि त्याअंतर्गत घोषणापत्र द्यावे.**

**दिनांकः 17.08.2025** **स्वा/-**
**स्थानः नागपूर** **प्राधिकृत अधिकारी**
**ओमकारा अॅसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**(ओमकारा पीएस 47/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)**



**IDFC FIRST Bank — आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**

CIN: L65110TN2014PLC097792
नोंदणीकृत कार्यालयः केआरएम टॉवर्स, सातवा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई -600031.
टेलीः +91 44 4564 4000 | फॅक्सः +91 44 4564 4022
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड शी एकत्रीकरण होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)

**परिशिष्ट - IV - ए [नियम 8(6) व 9(1) ची तरतूद पाहावी]**
**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे स्तंभ (iii) मध्ये नमूद कर्जदार, सह-कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या स्तंभ (iv) मध्ये नमूद अचल मालमत्तेचा आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची आयडीएफसी बँक लिमिटेड) च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा घेतलेला असून त्यांची आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची आयडीएफसी बँक लिमिटेड) यांना स्तंभ (i) नुसार घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया आयडीएफसी फर्स्ट बँकेची वेबसाईट म्हणजे www.idfcfirstbank.com मध्ये दिलेली लिंक पाहावी.

Online Property Survey

| अ. क्र. | i) मागणी सूचनेतील रक्कम | (ii) करार आयडी | (iii) कर्जदार, सह-कर्जदाराचे आणि जामीनदाराचे नाव | (iv) तारण मालमत्तेचा पत्ताः | (v) आरक्षित किंमत | (vi) बयाणा रक्कम | (vii) लिलाव दिनांक आणि वेळ | (viii) लिलावाच्या बयाणा रकमेचा दिनांक व वेळ | (ix) पाहणी दिनांक आणि वेळ | (x) प्राधिकृत अधिकारयाचे नाव आणि संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रु. 54949929.44/- मागणी सूचना दिनांकः 26-नोव्हें-2022 | 11057012, 10525994 & 35691720 | डेल्ही वूड वूल (प्रोप्रा. जफर अली अन्सारी), जफर अली अन्सारी आणि गुलशन जहान अन्सारी | **मालमत्ता 1:** महापालिका घर क्र. 2253, जमिनीचे क्षेत्रफळ 211.9 चौ.मी., प.ह.न. 17, खाता क्र. 36, वॉर्ड क्र. 43, ख.क्र. 21/1, 22, क्षेत्रफळ सुमारे 4.04 हेक्टर, शीट क्र. 15, सीटीएस क्र. 27, मौजा वांजरी, कामठी रोड, तह. व जि. नागपूर, महाराष्ट्र. | रु. 32238129.60/- | रु. 3223812.96/- | 03-सप्टें-2025 रोजी सका. 11.00 ते दु. 1.00 वाजेपर्यंत | 02-सप्टें-2025 रोजी सका. 10.00 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत | 25-ऑगस्ट-2025 सका. 10.00 ते दु. 4.00 वाजेपर्यंत | नाव- स्वप्निल चोपडे संपर्क क्रमांक- 8552099666 नाव - कंजारिया कुणाल संपर्क क्रमांक- 8080249675 |
| | मालमत्तेच्या स्थानाचे व मालमत्तेच्या इमेजचे क्यूआर कोड मालमत्ता-1 | | | | **मालमत्ता 2** - महापलिका घर क्र. 2253, क्षेत्रफळ सुमारे 1500 चौ.मी., प.ह.न. 17, खाता क्र. 36, वॉर्ड क्र. 43, ख.क्र. 21/1, 22, क्षेत्रफळ सुमारे 4.04 हेक्टर, शीट क्र. 16, सीटीएस क्र. 27, मौजा वांजरी, कामठी रोड, तह. व जि. नागपूर, महाराष्ट्र. | | | मालमत्तेच्या स्थानाचे व मालमत्तेच्या इमेजचे क्यूआर कोड मालमत्ता - 2 | | |

**अस्वीकरणः** कृपया लक्षात घ्यावे की सदर सूचना केवळ अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी जारी करण्यात येत असून अचल मालमत्तेवर स्थित चल मत्तांची विक्री करण्याचा अधिकार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड यांना नाही.

**दिनांकः 17.08.2025**
**स्थानः नागपूर**
प्राधिकृत अधिकारी,
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची आयडीएफसी बँक लि.)